**प्रेसनोट** **दिनांक १२/०५/२०१९**

## विमानतळ पोलीस स्टेशन पुणे

## विमानतळ पोलीसांनी मटक्याचे अवैध धंदयावर छापा टाकुन ३ इसमांना अटक केली

दिनांक ०९/०५/२०१९ रोजी विमानतळ पोलीस स्टेशन येथील तपास पथकातील पोलीस नाईक २२६९ आढारी यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, फोर पॉईन्ट हॉटेलच्या शेजारी मोकळया जागे मध्ये नगर रोड पुणे येथे सुरेश सकट नावाचा इसम विना परवाना,बेकायदेशिर रित्या मटका नावाचा जुगार स्वतःचे फायदयासाठी घेत आहे, अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने पोलीस नाईक आढारी पो.ना.विष्णु गोणे,पोशि प्रशांत कापुरे,पोशि पुषेद्र चव्हाण यांनी सदर ठिकाणी १९/३० वाजता छापा टाकुन इसम नामे १.सुरेश दत्तु सकट वय ६० वर्षे रा. खुळेवाडी, चंदननगर पुणे २.राजु सोमा चव्हाण वय ३९ वर्षे सर्व्हे नं. १४ नाईक चाळ, येरवडा पुणे. ३. रवि लक्ष्मण काटे वय २७ वर्षे रा. सम्राट चौक सर्व्हे नं.१९९ गणपती चौक विमाननगर पुणे यांना ताब्यात घेवुन अ.नं. १ याचे ताब्यातुन १०८०/- रुपयाचे जुगाराचे साहीत्य रायटर पॅट, पेट, मटका जुगार आकडे घेण्याकरीता वापरणारे बुक ताब्यात घेतले तसेच अ. नं. २ यांचेकडुन १४०/- रुपयाच्या मटक्याच्या चिठ्ठया, अ.नं.३ याचेकडुन ९०/- रुपयाच्या मटक्याच्या चिठ्टया असा एकुण १३३५/- रोख रक्कम व जुगाराचे साहित्यासह ताब्यात घेवुन त्यांचे विरुध्द येथे प्रशात कापुरे पोशि ७३०१ विमानतळ पोलीस स्टेशन पुणे यांनी महाराष्ट्र जुगार कायदा सन १९८७ चे कलम १२ अ प्रमाणे फिर्याद दिलेली देवुन गुन्हा रजि नंबर २०१/२०१९ दाखल केलेला आहे. पोलीस नाईक आढारी विमानतळ पोलीस स्टेशन पुणे यांनी त्यांना दाखल गुन्हयात अटक केलेली आहे. दाखल गुन्हयाचा तपास पोलीस नाईक आढारी विमानतळ पोलीस स्टेशन पुणे हे करीत आहेत.

(राजेंद्र पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर